# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मुंबई खाजगी प्राथमिक शाळा सुधारित अनुदान संहितेस मंजूरी मिळणेबाबत

**(१) ७५६८ (२६-०७-२०१०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपलिका प्रशासनाने आपल्या दिनांक ०७ मे, २००७ च्या पत्रान्वये सुधारित खाजगी प्राथमिक शाळा संहितेला सचिव, शालेय शिक्षण विभागाकडून मान्यता देण्याची विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसे मुंबई मनपाला कळविण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, ही कार्यवाही कधीपर्यंत पूर्ण होईल ?

**श्री.दिपक केसरकर (०९-११-२०२३) :** (१) व (२) सुधारित खाजगी प्राथमिक शाळा संहिता महानगरपालिकेने दिनांक ०७ मे, २००७ अन्वये सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभागास मंजूरीकरीता पाठविण्यात आली होती. सदरच्या सुधारित अनुदान संहितेमध्ये शासनाने अंशत: बदल करुन ती बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांना लागू करण्यासाठी मंजूरी दिली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागपूर शहरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी प्रक्रिया राबविण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करुन महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) १२६९२ (२३-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून महानगरपालिकेतर्फे एका खाजगी कंपनीमार्फत केलेल्या सर्वेक्षणात ही संख्या १ लाखांपेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोकाट कुत्र्यांची नसबंदी प्रक्रिया माहे ऑगस्ट, २०२० पासून निधीअभावी बंद असून प्रादेशिक पशुसंवर्धन विभागामार्फत याबाबतचा प्रस्ताव दिनांक १० मार्च, २०२१ रोजी शासनाच्या सबंधित विभागाकडे पाठविण्यात आला असून अद्यापपर्यंत राज्य शासनाकडून प्रस्तावाला मंजुरी व निधी प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोकाट कुत्र्यांमुळे नागपूर शहरातील वाहनचालक व नागरिक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी प्रक्रिया राबविण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करुन महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-१०-२०२३) :** (१) नागपूर शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून महानगरपालिकेद्वारे सन २०१६-२०१७ या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणानुसार सदर संख्या ८११८८ इतकी होती.
(२) नागपूर शहरातील भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्याकरीता नियमावलीतील तरतुदीनुसार मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया व अॅटी रेबीज लसीकरण कार्यक्रम सन २००६ पासून विविध सेवा भावी संस्थांमार्फत राबविण्यात येत आहे. सन २०११-१२, सन २०१६-१७ व सन २०२० ते २०२३ या कालावधीमध्ये महानगरपालिकेने स्वत: व शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयामार्फत हा कार्यक्रम राबविला आहे. भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव कमी होण्याकरीता नागपूर महानगरपालिकेने सादर केलेला विशेष प्रकल्प प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) भटक्या कुत्र्यांच्या बाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहेत.
(४) विशेष प्रकल्प प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(३) १३२९८ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतची आग्रही मागणी म्युनिसिपल सेकंडरी स्कूल्स रिटायर्ड एम्प्लॉ. असोसिएशनने महापौर आणि आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दिनांक १८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेतील सुमारे ३५०० सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबतच्या प्रस्तावास आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नद्या प्रदूषणमुक्त करुन नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(४) १५५०० (२९-१२-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक उद्योगांचे प्रदूषित पाणी नद्यांमध्ये सोडल्यामुळे नद्या प्रदूषित झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील नद्या प्रदूषणमुक्त करुन नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-१०-२०२३) :** (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कोणत्याही उद्योगास अप्रक्रियायुक्त सांडपाणी नदीमध्ये विसर्ग करण्यास परवानगी देण्यात येत नाही.
(२) मा.राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशानुसार नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठीचा आराखडा तयार करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात येते.

तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन सांडपाण्याची गुणवत्ता तपासण्यात येते व दोषी उद्योगांवर जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा,1974 अंतर्गत व वायू (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा,1981 अंतर्गत कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील नर्सरी बागेतील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्मारकाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५) १५७१२ (२९-१२-२०२२) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील नर्सरी बागेतील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाला तसेच खर्चाच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात येवूनही गेल्या अनेक महिन्यापासून सदर कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने छत्रपती शाहू महाराज समाधी स्मारकाचे काम सुरु करुन पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर कामाबाबत दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सदर प्रकल्पाची जमीन सामाजिक न्याय विभागाच्या नावे करणे आवश्यक आहे, ही दिनांक २८ जुलै, २०२१च्या शासन निर्णयामधील परिच्छेद ३मधील अट सदर प्रकरणी शिथील करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना नोकरी देण्याबाबत

**(६) १५८८८ (२९-१२-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६२० ला दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेत २० वर्षापेक्षा जास्त वर्षांपासून कार्यरत असलेल्या ४४०७ हजार सफाई कामगारांची सेवा स्थायी करण्याबाबत दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या निर्णयान्वये निर्देश दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवजदार सफाई कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त/ मृतक झाल्यास त्यांच्या वारसदारांना लाड कमिटीअंतर्गत नोकरी देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एवजदार व त्यांच्या वारसांचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) शासन निर्णय दिनांक २० सप्टेंबर, २०१९ अन्वये अधिसंख्य पद कोणत्याही कारणास्तव रिक्त झाल्यास ते त्या दिनांकापासून आपोआप व्यपगत होत आहे. यामुळे वारसांकरीता अधिसंख्य पद निर्माण अथवा पुर्नजिवित करणे शक्य नाही. अधिसंख्य सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसा हक्क सोडून इतर लाड पांगे समितीच्या शिफारशी लागू आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धाराशिव नगरपरिषद हद्दीत अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यावसायिकावर तसेच बांधकामास परवानगी देणाऱ्या जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(७) १७३२७ (२५-०३-२०२३) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नंबर १४५/५ मध्ये छत्रपती हाऊसिंग सोसायटी, पोलीस अधीक्षक मुख्यालयासमोर सौ.पुजा प्रसाद पाटील यांचे घर क्र.२७/८३/१ व श्री.प्रसाद रंगनाथराव पाटील घर क्रमांक २७/८३/१ ब, आनंदनगर, धाराशिव यांनी खुल्या जागेत रेखांकनातील अंतर्गत रस्त्यावर अतिक्रमण व

भूमिगत खोदकाम करुन व खुल्या जागेत बोअरवेल पाडून बांधकाम करीत असल्याची तक्रार मुख्याधिकारी, धाराशिव यांचेकडे दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामासबंधीत माहिती विचारली असता नगररचना विभागाने संबंधित बांधकामाची बांधकाम परवान्याची संचिका उपलब्ध नाही, असे जा.क्र.५८८७/२०२२, दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजीनुसार लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर व्यक्तिने नगर परिषदेची बांधकाम परवानगी नसताना विनापरवाना बांधकाम करीत असून मंजूर रेखांकनातील खुल्या जागेत व अंतर्गत रस्त्यावर खोदकाम करुन तसेच सदरील जागेवर बांधकाम व अतिक्रमण करुन मुख्य राज्य रस्त्याच्या रहदारीस अडथळा करीत असून त्याठिकाणी चार मजली मॉल बेकायदेशीरपणे उभारत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अनधिकृत बांधकाम थांबवून अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यावसायिकावर व बांधकामास परवानगी देणाऱ्या जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

धाराशिव नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं.१४५/५ मध्ये श्री.प्रसाद रंगनाथ पाटील व सौ.पुजा प्रसाद पाटील यांनी अनधिकृत विकास काम हाती घेतले असल्याचे निदर्शनास आल्याने, संबंधितांस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५१ ते ५७ अनुसार कार्यवाहीस पात्र होत असल्याने, कलम ५३ अन्वये नोटीस देण्यात आली होती.
(४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी आदेशित केल्यानुसार नगरपरिषदेमार्फत तत्कालीन मुख्याधिकारी यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, आनंदनगर, धाराशिव येथे दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच संबंधित व्यवसायिकावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ व ५४ नुसार कार्यवाही करण्यात आली असून, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे नगरपरिषदेमार्फत अपिल दाखल करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रोहा (जि.रायगड) रेल्वे क्रॉसिंगवर बांधण्यात येत असलेल्या उड्डाणपुलाच्या भरावात घातक रासायनिक कचरा टाकण्यात येत असल्याबाबत

**(८) १८७९७ (२०-०६-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) रेल्वे क्रॉसिंगवर बांधण्यात येत असलेल्या उड्डाणपुलाच्या भरावात ठेकेदाराकडून घातक रासायनिक कचरा टाकण्यात येत असल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक ५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यावरण कायद्यांतर्गत घातक घनकचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने करणे बंधनकारक असताना ठेकेदाराने त्याचा वापर उड्डाणपुलाच्या भरावासाठी केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उड्डाणपुलाच्या भरावात घातक रासायनिक कचरा टाकणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेची अपघात विमा योजना बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(९) १८९८२ (०८-०८-२०२३) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेची अपघात विमा योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघात विमा योजना बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर योजना पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत शासन फेरविचार करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत घरबसल्या कमाईचे प्रलोभन दाखवून सायबर चोरांकडून अनेकांची लूट होत असल्याबाबत

**(१०) १९१२५ (०४-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत सायबर चोरांकडून घरबसल्या कमाईचे प्रलोभन दाखवून अनेकांची लूट होत असल्याचे माहे एप्रिल,२०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात मुंबईच्या अनेक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन हे फसवणूकीचे गुन्हे रोखण्याबाबत तसेच मुंबईच्या अनेक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झालेल्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) घरबसल्या कमाईचे प्रलोभन दाखवून लोकांच्या झालेल्या फसवणुकीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०२३ मध्ये मुंबई शहरातील पोलीस ठाणे येथे नोंद झालेल्या गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| माहे एप्रिल २०२३ | ६५ | ९ | १९ |

राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता एकूण ४८ सायबर पोलीस ठाणी कार्यान्वित झाली आहेत. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्याकरीता विविध पोलीस घटकातील एकूण ३२५३ पोलीस अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व सायबर पोलीस ठाण्यांना गुन्ह्याच्या तपासाकरीता अत्याधुनिक यंत्रसामग्री, विविध प्रकारचे १६ टूल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत १००० पोलीसांना सायबर गुन्ह्यांच्या तपासात मदत व्हावी यासाठी तज्ञ सल्लागारांच्या मदतीने फॉरेन्सिक टूल्सचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे. सायबर गुन्हे संदर्भातील सर्व प्रकारच्या तक्रारी हातळण्यासाठी National Cyber Crime Reporting Portal सुरू करण्यात आले आहे व नागरिकांना येणाऱ्या शंकाचे समाधान करण्यासाठी टोल फ्री हेल्प लाईन क्र.१९३० सुरु करण्यात आला आहे. संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी जनजागरुकता शिबिरे घेतली जातात. तसेच सोशल मिडियाद्वारे, इंटरनेट माध्यमांद्वारे देखील सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते. सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी मार्गदर्शिका (ॲडवायझरी) प्रसारित करून सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता मिशन कार्यालयाकडून वैयक्तीक स्वच्छतगृह बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) १९२८३ (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पाणीपुरवठा व स्वच्छता मिशन कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागात जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी वैयक्तिक स्वच्छता गृहाचे बांधकाम करुन त्याचा वापर करावा याकरीता प्रत्येक जिल्ह्याला बांधकामाचे उद्दिष्ट व ते पूर्ण करण्यासाठी अनुदान दिले जात असून अपूर्ण प्रस्तावामुळे लाभार्थ्यांचे प्रोत्साहन अनुदान प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात चालू आर्थिक वर्षात ९९१८२ स्वच्छतागृहाची कामे पूर्ण करण्यात आली असून या लाभार्थ्यांना जिल्हास्तरावरून डीबीटीच्या माध्यमातून १२ हजारांचे अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा होणे अपेक्षित आहे. मात्र अजूनही तब्बल ६० टक्के म्हणजेच ५९५६९ लाभार्थ्यांना ७१.४८ कोटी रुपयांचे अनुदान देणे शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैयक्तिक स्वच्छतागृह बांधण्यासाठी १२ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येत असून अनुदान योजना केंद्र आणि राज्य शासनाच्या विद्यमाने राबविण्यात येते यात केंद्र शासनाचा ७५ टक्के म्हणजेच ९००० रुपये आणि राज्य शासनाचा २५ टक्के म्हणजेच ३,००० रुपये हिस्सा असून सदर प्रोत्साहन अनुदानामुळे दारिद्रय रेषेखालील सर्व कुटुंबांना तर दारिद्रयरेषेवरील अपंग, अल्पभूधारक, स्त्री कुटुंबप्रमुख, शेतमजुर यांना प्रोत्साहन योजनेमुळे दिलासा मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लाभार्थ्यांकडून स्वच्छतागृहाचे बांधकाम केल्यानंतर अनुदानासाठी प्रस्ताव दाखल करताना संबंधित बांधकामाची कागदपत्रे, छायाचित्र यासह इतर बाबी जोडणे आवश्यक असताना अपूर्ण प्रस्ताव येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यात स्वच्छतागृह बांधकाम व अनुदान वाटपाचा आढावा घेऊन प्रलंबित प्रोत्साहन अनुदान वाटपासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०९-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात १,२५,७६४ लाभार्थ्यांनी वैयक्तिक स्वच्छतागृहाचे बांधकाम पूर्ण केलेले होते. त्यापैकी दिनांक ३१/०८/२०२३ पर्यंत १,२४,७२१ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान अदा करण्यात आले असून, १०४३ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याचे शिल्लक आहे.

सन २०२३-२४ या वर्षात दिनांक ०१/०४/२०२३ पासून दिनांक ३१/०८/२०२३ पर्यंत वैयक्तिक स्वच्छता गृहाचे बांधकाम पूर्ण केलेल्या ३३,४६० लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यापैकी १६,५८२ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान अदा करण्यात आले असून १६,८७८ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याचे शिल्लक आहे.

उपरोक्तप्रमाणे एकूण १७,९२१ (१०४३+१६,८७८) लाभार्थ्यांचे रुपये २१.५० कोटी इतके प्रोत्साहन अनुदान देण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरू आहे.
(३) होय, हे खरे आहे.

तथापि, स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्तूत बाबींकरीता निधीची तरतूद केंद्र व राज्य हिस्सा अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात करण्यात येत आहे.
(४) होय, हे खरे आहे.

प्रस्तूत प्रकरणी सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावांसोबत लाभार्थ्यांचे आधार कार्ड, बँक पासबुक, नमुना नं. ८, ग्रामपंचायतचा ठराव इ. कागदपत्रे वेळेत सादर करण्यात येत नाहीत. तसेच लाभार्थ्यांचे बँक खाते आधारशी लिंक नसल्याने, लाभार्थ्यांना PFMS प्रणालीद्वारे प्रोत्साहन अनुदान अदा करण्यास विलंब होतो.
(५) होय.

वैयक्तिक स्वच्छता गृहाचे बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान तातडीने अदा करण्याच्या अनुषंगाने शासन तसेच राज्य पाणी व स्वच्छता मिशन स्तरावरून जिल्ह्यांना वेळोवेळी VC द्वारे सूचना देण्यात येत आहेत. तसेच याबाबत विशेष मोहीम राबविण्याबाबत जिल्ह्यांना दिनांक ७/१२/२०२२ व २४/०२/२०२३ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार जिल्हास्तरावर विशेष मोहीम राबविण्यात आली होती. सद्य:स्थितीत आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्याबाबत जिल्ह्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिखली (ता.पिंपरी चिंचवड, जि.पुणे) येथील जलतरण तलावात नागरिकांना पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(१२) १९५०१ (०८-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, अॅड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (ता.पिंपरी चिंचवड, जि.पुणे) येथील जलतरण तलावात पोहण्यासाठी नागरिकांना ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करूनही पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संभाजीनगर येथील जलतरण तलावात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जलतरण तलावातील दुर्गंधी दूर करण्याबाबत तसेच सोई-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संभाजीनगर येथील जलतरण तलावावरील तलाव परिसर, पाणी शुध्दीकरण,परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती इ. कामे निविदेद्वारे मे. देवा स्विमिंग इन्स्टिटयुट, निगडी यांना देणेत आले असून सदर संस्थेमार्फत जलतरण तलाव परिसराची नियमित साफसफाई व स्वच्छता करणे येत असल्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिका परिवहन प्रशासनाने बसेसवर चित्रपटाच्या जाहिराती मोफत प्रदर्शित केल्याबाबत

**(१३) २००२२ (०९-०८-२०२३) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका परिवहन प्रशासनाने धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे या मराठी चित्रपटाच्या जाहिराती निविदा प्रक्रिया न राबविता वर्षभर महापालिकेच्या सुमारे २० बसेसवर मोफत चिकटवल्याचे तसेच सदर चित्रपटाचे जाहिरातीचे लाखो रुपयांचे भाडे महानगरपालिका परिवहन प्रशासनास देण्यात आले नसल्याचेही दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(२) असल्यास, गत आठ वर्षांपासून परिवहन प्रशासनाने उत्पन्न वाढीसाठी तीन वेळा बसेसवरील जाहिरातीसाठी निविदा काढूनही निविदा प्रक्रियेला ठेकेदारांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने ठाणे महापालिकेच्या बसेस विना जाहिरात ठाणे शहरात फिरत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे परिवहन प्रशासनाची आर्थिक स्थिती बिकट असतानाही निविदा प्रक्रियेविना व ठेकेदार न नेमता चित्रपटाच्या जाहिराती कोणाच्या आदेशानुसार बसेसवर लावण्यात आल्या असून गत वर्षापासून सदर जाहिरातीच्या भाड्यापोटी किती रक्कम मिळणे अपेक्षित आहे व त्याबाबत चित्रपटाचे निर्माते व संबंधित व्यवसायिक यांचेकडून किती वसुली करण्यात आली तसेच मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई शहरातील बसेसवर “आपला दवाखाना” या प्रदर्शित करण्यात आलेल्या जाहिरातीबाबत उत्पन्नाच्यादृष्टीने काय परिस्थिती आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली असता चौकशीच्या अनुषंगाने निविदाप्रकियेविना टीएमटी बसेसवर जाहिराती लावणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई तसेच जाहिरातीच्या भाड्यापोटी संबंधितांकडून वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाच्या जाहिराती प्रदर्शित झाल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बस ताफ्यातील बसेसवर माहे नोव्हेंबर, २०२१ पर्यंत जाहिरात प्रदर्शित करण्याचे काम कंत्राटदारास देण्यात आले होते.

ठाणे परिवहन सेवेकडे JNNURM अंतर्गत प्राप्त झालेल्या बसेसचे परिचालन, देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम मे. सिटी लाईफ लाईन ट्रॅव्हल्स प्रा. लि यांना देण्यात आले असून त्यांचेकडील बसेसवर उक्त जाहिराती लावल्याचे निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेमार्फत जाहिराती काढुन टाकण्याचे लेखी नोटीसीने कळविण्यात आले. तद्नंतर सदरच्या जाहिराती काढुन टाकण्यात आलेल्या आहेत. तसेच महानगरपालिका स्तरावर जाहिरात शुल्क वसुलीची कार्यवाही अंतिम करणे सुरु असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

तसेच “आपला दवाखाना” संदर्भात जाहिराती स्वखर्चाने प्रसिध्द केल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिकेच्या हद्द वाढीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(१४) २०१२४ (०९-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिकेच्या हद्द वाढीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाकडे केव्हापासून प्रलंबित आहे व त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भुसावळ नगरपालिकेच्या हद्दवाढीच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक ११/०१/२०२३ रोजी सादर केलेला प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने, सदर प्रकरणी हद्दवाढीमध्ये प्रत्यक्षात नागरी वस्ती अस्तित्वात असलेल्या क्षेत्राचा, प्रस्तावित हद्दवाढ क्षेत्रातील लोकसंख्या, नगररचना विभागाचे अभिप्राय व अकृषिक रोजगाराच्या टक्केवारीचा समावेश करुन, चिन्हांकित नकाशा व प्रारुप अधिसूचनेच्या मसुद्यासह, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमातील कलम ६ व कलम ३ पोट-कलम (२) नुसार, नव्याने परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक १६/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांना कळविण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत भुसावळ नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार शहर महानगरपालिकेत शहर अभियंत्याचे रिक्त पद भरण्याबाबत

**(१५) २०३०९ (०९-०८-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेतील शहर अभियंताचे पद रिक्त असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील अनेक प्रस्तावित विकास कामांना मंजुरी देणे तसेच मंजूर झालेल्या विकास कामांना कार्यादेश देणे यासारखी कामे प्रलंबित असल्याने शहर अभियंता हे पद त्वरीत भरण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी तसेच 'समर्थन' संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मा.आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्याकडे लेखी निवेदनांद्वारे दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विकास कामे करण्यासाठी शहर अभियंता उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१) व (२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे. तथापि, शासनाने वेळोवेळी शहर अभियंता पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत नियमोचित कार्यवाही केली आहे. तसेच यासंदर्भात शहर अभियंता पद प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी शहरातील काँग्रेस भवन ते मांडवी (बंदर रोड) रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणेबाबत

**(१६) २०३२१ (०९-०८-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी शहरातील कॉंग्रेस भवन ते मांडवी (बंदर रोड) रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण करणेबाबत स्थानिक नागरिकांची व पर्यटकांची मागणी विचारात घेऊन ‘समर्थन’ संस्थेने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ रोजी निवेदन मा.मंत्री, सार्वजनीक बांधकाम, तसेच दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान स्मरण पत्र मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, (उद्योग तथा पालक मंत्री रत्नागिरी), जिल्हाधिकारी (रत्नागिरी), मुख्याधिकारी (नगरपरिषद, रत्नागिरी) यांच्याकडे दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करणेबाबत मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबत तसेच बांधकामाला सुरुवात होणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) स्थानिक लोकांची मागणी व रस्त्यावरील रहदारीचा विचार करता, रत्नागिरी शहरातील काँग्रेस भवन ते मांडवी (बंदर रोड) रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे आवश्यक आहे. नगरपरिषदेची आर्थिक स्थिती पाहता विशेष निधी प्राप्त होणे आवश्यक आहे. निधी प्राप्त होताच रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंत्रालयीन लिपिक व कर सहाय्यक कौशल्य चाचणीचे पात्रता निकष ठरवणेबाबत

**(१७) २०३७३ (०९-०८-२०२३) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालयीन लिपिक व कर सहाय्यक कौशल्य चाचणीला पात्र सर्व उमेदवार हे महाराष्ट्र परीक्षा परिषदेने घेतलेल्या GCC TBC नुसार मराठी ३० आणि इंग्रजी ४० प्रमाणपत्रधारक आहेत. आयोगाकडून घेण्यात येणारी कौशल्य चाचणी ही या प्रमाणपत्राच्या अर्हतेनुसार घेणे अपेक्षित होते परंतु, माहे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात आयोगाने परिपत्रकात काढून होणारा उतारा हा Key Depression ऐवजी शब्दानुसार होणार असल्याचे सुचनेत नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार दिनांक ७ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या परीक्षेसाठी आलेल्या मराठी उताऱ्याची शब्दमर्यादा (१६४० Key Depression) जास्त देण्यात आली. तसेच यावेळी परीक्षेत बऱ्याच उमेदवारांना आलेल्या तांत्रिक अडचणीमुळे दिनांक ३१ मे,२०२३ रोजी पुन्हा कौशल्य चाचणी घेण्यात येणार असून या वेळी मराठीचा उतारा दिनांक ७ एप्रिल,२०२३ पेक्षा जास्त म्हणजे जवळपास १९०० Key Depression किंवा ३०० शब्दाचा देण्यात आला असल्याचे दिनांक १६ जून,२०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतका मोठा उतारा पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र परीक्षा परिषद GCC TBC मराठी ५० चे प्रमाणपत्र आवश्यक असून कौशल्य चाचणी ही निव्वळ पात्रता परीक्षा असल्यामुळे आयोगाने केलेल्या ९३% शब्द इतक्या अवघड निकषामुळे पूर्व, मुख्य हा टप्पा पार करुन आलेले खूप उमेदवार अपात्र होण्याची शक्यता असल्याने विद्यार्थ्यांना खूप आर्थिक व मानसिक त्रासास सामोरे जावे लागणार आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करुन व दोन्ही स्किल टेस्टमधील गोंधळाचा विचार करता आयोगाने स्किल टेस्ट रद्द करुन उपस्थित विद्यार्थ्यांच्या मुख्य परीक्षेच्या मार्कनुसार निकाल लावावा किंवा सन्माननीय आयोगाने पात्रता निकष इतर पात्रता परिक्षेप्रमाणे जसे की MPSC CSAT प्रमाणे आमच्या टायपिंग पात्रता परिक्षेचे निकष मराठी ३०० शब्दाच्या व इंग्रजी ४०० शब्दांच्या ३३% इतका कमी करुन निकाल लावावा अशी मागणी शासनाकडे केली असून त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी निकष key depression, वेळ व सीमांकन मर्यादा निश्चित करताना STAFF SELECTION COMMISSION कडून घेण्यात येणाऱ्या टंकलेखन कौशल्य चाचणीचे निकष महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून विचारात घेण्यात आले आहेत. दिनांक ७ एप्रिल, २०२३ रोजी आयोजित टंकलेखन कौशल्य चाचणी दरम्यान काही उमेदवारांना तांत्रिक अडचणी आल्यामुळे दिनांक १५ मे, २०२३ रोजी प्रस्तुत संवर्गासाठी नव्याने टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्याचा निर्णय आयोगाकडून घेण्यात आला व त्यानुसार दिनांक ३१ मे, २०२३ रोजी आयोजित मराठी टंकलेखन कौशल्य चाचणीचा उतारा जवळपास १९०० key depression होता.परंतु, आयोगाच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ व दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकांनुसार मराठी टंकलेखन कौशल्य चाचणीचा उतारा हा १५०० key depression असेल असे प्रसिध्द करण्यात आले होते. यास्तव प्रस्तुत संवर्गांच्या मराठी टंकलेखन चाचणीचा निकाल तयार करताना प्रत्यक्ष उताऱ्यात १९०० key depression असले तरी निकाल तयार करताना १५०० key depression नुसार जेवढे शब्द तयार होतील त्याच्या ९०% व ९३% शब्द हा निकष निकाल तयार करताना लावण्यात आला आहे. त्यानुसार प्रस्तुत संवर्गांसाठी शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

## नागपूर शहरात पायाभूत सुविधा व नागरी सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने अंमलबजावणी करण्याबाबत

**(१८) २०५८२ (०९-०८-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात पायाभूत सुविधा व नागरी सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने योग्य अंमलबजावणी करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने गत काही वर्षांत अनेक विदेशी कंपन्यांसोबत करार केले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदेशी कंपन्यांसोबत केलेल्या कराराच्या अनुषंगाने महानगरपालिकेने अद्याप कोणतीच अंमलबजावणी केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील पायाभूत व नागरी सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी विदेशी कंपन्यांसोबत केलेल्या कराराची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता १००० + २०% टन प्रतिदिन क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र (१५+१५) ३० वर्षांकरीता डिझाईन, फायनांस, बांधा, स्वमालकीचा करा, वापरा, आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे आणि देखभाल दुरुस्ती करणे करीता निविदा प्रक्रियेद्वारे निवड करण्यात आलेल्या विदेशी कंपनी M/s. SusBDe Holding B.V. (IV) यांचेशी नागपूर महानगरपालिकेद्वारे दिनांक १३/०४/२०२३ ला करारनामा करण्यात आला असून प्रकल्प उभारणीकरीता कंपनीला १८ महिने कालावधी देण्यात आलेला आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) M/s. SusBDe Holding B.V. (JV) आणि नागपूर महानगरपालिका यांचे दरम्यान करारनामा दिनांक १३/०४/२०२३ च्या अनुषंगाने प्रकल्प उभारणीकरीता २३.६२ एकर जागा आणि दैनंदिन येणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता ९ एकर जागा दिनांक ३०/०६/२०२३ ला देण्यात येवून कंपनीशी जागेचा लायसंस करारनामा करण्यात आलेला आहे. कंपनीद्वारे फायनान्सीयल क्लोजर (Financial Closure) ची कार्यवाही सुरु आहे. सदरहू प्रकल्प उभारणी फायनान्सीयल क्लोजर नंतर १८ महिने कालावधीत पूर्ण होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) मधील गोविंद कंपाऊंडमध्ये मोती कारखान्याला भीषण आग लागल्याबाबत

**(१९) २०७११ (०९-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) गोविंद कंपाऊंड मधील मोती कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडीत यंत्रमाग कारखाने व गोदामांना वारंवार आगी लागल्याच्या घटना घडत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भविष्यात अश्या घटना घडू नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१), (२) व (३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार गौतम कंपाऊंड, गल्ली नं. ३ नवी वस्ती भिवंडी या ठिकाणी मोती कारखाण्याला दिनांक १९/०४/२०२३ रोजी आग लागल्याची घटना घडली असून सदरची आग भिवंडी अग्निशमन दलामार्फत विझविण्यात आली.

तथापि, महानगरपालिका हद्दीमध्ये असलेल्या विविध प्रकारच्या व्यवसायिक आस्थापनाचे अग्निशमन विभागाकडून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व नियम २००९ अन्वये फायर सेफ्टी ऑडिट करण्यात येते. तसेच त्यांच्याकडे असलेली अग्निशमन सुरक्षा यंत्रणा हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई आणि पुणे येथे मुला - मुलींची वस्तीगृह सुरू करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२०) २०७६० (०४-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, पुण्यातील मुला - मुलींसाठी १००० क्षमतेच्या वस्तीगृहासाठी जागा मिळावी, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शिल्लक अनामत रकमेच्या ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करावी असा प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयाने राज्य शासनाला पाठवावा, यासह इतर मागण्यांसाठी कॅम्प संस्थेने उच्च शिक्षण संचालनालयासमोर आंदोलन सुरू असल्याची बाब माहे मे, २०२३ शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई आणि पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे मुला -मुलींच्या वस्तीगृहासाठी जागा देणेबाबत उच्च शिक्षण विभागाच्या संचालकांनी पत्रव्यवहार करूनही अद्याप जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्य मागण्यांमध्ये उच्च शिक्षण विभागातील १२ विभागीय सहसंचालक यांचा अतिरिक्त कार्यभार तात्काळ वाढवावा, शासकीय महाविद्यालय संस्थामध्ये पाच वर्ष पूर्ण झालेल्या सर्व प्राचार्य संचालकाची प्रशासकीय बदली तात्काळ करावी अशा मागण्याही शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई आणि पुणे येथे मुला -मुलींची वस्तीगृह सुरू करण्याबाबत व इतर मागण्यांच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२०-११-२०२३) :** (१) होय, कॉप्स या सामाजिक संस्थेने आंदोलन केले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय, मुंबई या वसतिगृहाच्या पुर्नबांधकामास शासन निर्णय दिनांक १/११/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सर ज.जी. कला संस्था वसतिगृह व वास्तुशास्त्र महाविद्यालय वसतिगृहाच्या इमारत बांधकामास शासन निर्णय दिनांक २७/१०/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शासकीय तंत्र निकेतन, मुंबई या संस्थेच्या मुलांचे व मुलींचे वसतिगृह इमारत बांधकामास शासन निर्णय दिनांक २७/१०/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकडे शिल्लक राहणाऱ्या अनामत रकमेचा विनियोग विद्यार्थ्यांसाठी करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १३/१०/२०२३ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत शासन निर्णय दिनांक १३/०१/२०२३ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

प्राचार्य, संचालक यांच्या बदल्यासंदर्भात महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुद व प्रशासकीय निकड विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.